# टंचाईग्रस्त/अवर्षणग्रस्त भागातील विदर्यांना परीक्षा फी माफी /प्रतीपूर्ती योजनेत्तर योजना

लेखाशिर्ष :- २२०२ सर्वसाधारण शिक्षण-८० सर्वसाधारण

८०० इतर खर्च (०४) (०१) अवर्षणग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी/प्रतीपूर्ती करणे सांकेतांक क्रमांक (२२०२ २५८८) ३४ शिष्यवृत्या व विद्यावेतने मागणी क्रमांक ई-२ योजनेत्तर योजना

शासन निर्णय क्रं. एफईडी/१५९२/१२०२/(११३२)/साशि-५ दिनांक १८/१०/१९९३ अन्वये टंचाईग्रस्त गावातील टंचाईग्रस्त भागातील पात्र विद्यार्थी / विद्यार्थीनींना लाभ देण्यात यावा.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने विहित केलेल्या दरानेच संबंधितांना परीक्षा फी ची प्रतिपूर्ती करण्यात यावी.

उपरोक्त शासन निर्णय दिनांक १८/१०/१९९३ मध्ये नमूद केल्यानुसार खालील प्रकारच्या विदयार्थ्यांना ही सवलत लागू असणार नाही.

१. ज्या विद्यार्थ्यांना शासनाच्या अन्य शैक्षणिक सवलती योजनेनुसार परीक्षा फी माफीची सवलत उपलब्ध आहे. (उदा.मागासवर्गीय विदर्यांना फी माफीची सवलत माध्यमिक शिक्षक शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पाल्यांना माध्यमिक स्तरावर फी माफीची सवलत, प्राथमिक शिक्षकांच्या पाल्यांना फी माफीची सवलत)
२. जे विदयार्थी त्याच परीक्षेत दुस-यांदा बसले असतील (रिपीटर)
३. जे विद्यार्थी बहिःस्थ (एक्सटर्नल) म्हणून नोंदलेले असतील.
४. ज्या विद्यार्थ्यांचे पालक शहरात प्रतयक्ष राहतात, नोकरी धंदा करतात, परंतु त्यांचे नावे गावी शेत जमीन आहे असे विद्यार्थी.